देशोन्नती

# आंदेगाव येथील शेतकरी प्रशिक्षण, समाधान सभेस शेतकऱ्यांचा प्रतिसाद

देशोन्नती वृत्तसंकलन

**जवळगाव :** हिमायतनगर तालुक्यातील आंदेगाव येथे जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी बाराटे यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण व समाधान सभेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन व सिमेंट नाल्या बांध मधील गाळ काढणे भर टाकणे आदी कामाचा शुभारंभ झाला.

१२ ऑक्टोबर रोजी हिमायतनगर तालुक्यातील आंदेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा कृषी अधीक्षक रावसाहेब बाराटे यांनी शेतकरी बांधवांना पिकात फवारणी व पीक लागवड संगोपन उत्पादन वाढ आदी विषयी प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. सदर सभेत नागरिकांना विविध समस्या जसे पांदण रस्ते समस्या, भूमी सिमेंट नाला बांधातील गाळ काढणी काम, पीएम किसान, सोयाबीन कापूस पिकास अर्थसाह्य याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथील शास्त्रज्ञ डॉ. रविकांत देशमुख यांनी रब्बी हरभरा पिकाची लागवड तंत्रज्ञान, हळद पिकावरील करपा व हुमणी कीड व्यवस्थापन तूर पिकावरील मर रोग, कापूस पिकावरील बोंडआळी व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. याप्रसंगी गुरुदेव शिवा मंडळाचे प्रचारक मधुकर इंदुरकर महाराज चंद्रपूरकर यांनी सामूहिक राष्ट्रवंदना दिली. पुन्हा आंदेगाव येथील पाच जुन्या सिमेंट बंधाऱ्यातील गाळ काढणे कामाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा कृषी अधीक्षक रावसाहेब बाराटे, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव, मंडळी कृषी अधिकारी निलेश वानखेडे, मारुती काळे, कृषी सहाय्यक स्वाती बेहेरे, बालाजी माजळकर, मुकुंद लोखंडे, सरपंच धम्मपाल वाढवे, मारुती निळकंठे, विठ्ठलराव देशमुख आदी उपस्थित होते. प्रास्ताविक निलेश वानखेडे यांनी केले. (वार्ताहर)

Nanded Edition
Oct 15, 2024 Page No. 7
Powered by: erelego.com